पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिसूचित सेवांमध्ये GPR नुसार सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः WSSD-२६०१४/६/२०२६-WSD-C.R.१७१३७९९/(COM.CELL)**
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग,
नविन मंत्रालय इमारत, मुंबई - ४०० ००१
दिनांक : १२ ऑगस्ट,२०२६.

**वाचा:-**

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.०३/पापु ०३, दि. २६.०९.२०२४ चे परिपत्रक.
२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दि.८ जून,२०२२ ची अधिसूचना.
३) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयाची दि.२०.०३.२०१८ ची अधिसूचना.
४) मा.मुख्यमंत्री सचिवालयाचे क्र.CMO/SD/०४२६/f-१९४, दि. १५.०४.२०२६ चे पत्र.
५) सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण १७२५/प्र.क्र.१२६/मातं, दि. ३०.०५.२०२५ चे शासन परिपत्रक.
६) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे क्र.-जा.क्र.मजीप्रा/आयटी सेल/४१/२०२६, दि.१३.०४.२०२६ चे पत्र.
७) मा.मुख्यमंत्री सचिवालयाचे प्रधान सचिव यांचे ई ऑफिस क्र. १०७०१५५५, दि.३१/७/२०२६ चे अ.शा. पत्र.
८) मा.मुख्यमंत्री सचिवालयाचे प्रधान सचिव यांचे ई ऑफिस क्र. १०७११३२३, दि. ३/८/२०२६ चे अ.शा. पत्र.

**प्रस्तावना:-**

मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात १०० दिवसांचा कृती आराखडा यशस्वीपणे राबविण्यात आल्यानंतर, सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.५ येथील शासन परिपत्रकान्वये १५० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला होता. त्या अनुषंगाने ई-प्रशासन सुधारणा उपक्रम चांगल्या प्रकारे अंमलात आणण्यासाठी शासनाच्या विविध सेवा अधिक पारदर्शक, सुलभ, कालबध्द, नागरिकाभिमुख व पूर्णत: डिजीटल स्वरुपात उपलब्ध करुन देण्यासाठी शासन प्रक्रिया पुनर्रचना (GPR) राबविण्याबाबत सर्व विभागांना निर्देश दिले होते.

त्यानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत संदर्भाधीन क्र.१ च्या शासन परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगांतर्गत प्रदान करण्यात येत असलेल्या विविध सेवांचा अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी अभ्यासगट गठीत करण्यात आला आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अभ्यासगटाने केलेल्या शिफारशीचे पुनर्विलोकन करण्यासाठी मा.मुख्यमंत्री सचिवालयाने संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये पुनर्विलोकन समिती गठीत केली होती. सदर समितीने, विभागाच्या कार्यगटाने केलेल्या शिफारशींचे पुनर्विलोकन करुन नागरिकांना सेवा मिळण्यास होणारा प्रशासकीय विलंब टाळण्यासाठी तसेच ऑनलाईन प्रणालीमार्फत सेवा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने काही सुधारणा सूचित केल्या होत्या. सदर बाबी विचारात घेऊन, क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त प्रस्तावास अनुसरुन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सेवा अधिक कार्यक्षम, पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकाभिमुख करण्याच्या अनुषंगाने सेवांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांचे सुसूत्रीकरण करण्याबाबत तसेच कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी GPR प्रणाली अंतर्गत खालीलप्रमाणे सुधारित स्वरुपात सेवा प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) **सेवांचे सुसूत्रीकरण** (Service Rationalisation) :- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सेवा हमी कायद्यांतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांचे सुसूत्रीकरण करुन समान स्वरुपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merging ), सेवा गटबद्धीकरण (Merge / bundle with another service), सेवा नसून माहिती /तक्रार / योजना आहे. (Not a service but Information / Grievances / Schemes ), अनावश्यक सेवा वगळणे (Discontinue) तसेच प्रक्रियांचे सुलभीकरण करुन संदर्भ क्र.२ व ३ अन्वये अधिसूचित केलेल्या सेवांची संख्या खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **सेवा प्रकार** | **सेवा देणारी यंत्रणा** | GPR पूर्वी **सेवा संख्या** | GPR नंतर **सेवा संख्या** |
|---|---|---|---|
| शासन ते नागरिक (G२C) | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | १६ | ०८ |
| शासन ते नागरिक(G२C), शासन ते शासन (G२G)व शासन ते व्यावसायिक (G२B) | भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय | ०२ | ०२ |
| | **एकूण** | **१८** | **१०** |

उक्त सेवांपैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८ सेवा या G२C असल्याने त्या आपले सरकार पोर्टलद्वारे (http://aaplesarkar.maharashtra.gov.in) तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयाच्या २ सेवा G२C, G२G व G२B असल्याने त्या सेवा आपले सरकार पोर्टलद्वारे तसेच मैत्री पोर्टलद्वारे प्रदान करण्यात येणार आहेत.

२) सेवा मंजूरी प्रक्रियेतील टप्पे कमी करणे व अधिकार प्रत्यार्पण करणे (Reducing / Streamlining Approval Steps):-

| **अ. क्र.** | **सेवेचे नाव** | सेवा मंजूरी प्रक्रियेतील टप्पे | |
|---|---|---|---|
| | | Before GPR | After GPR |
| **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** | | | |
| १ | नवीन नळ जोडणी. (New connection) | ४ | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | पुन:जोडणी करणे. (Reconnection) | ३ | ३ |
| ३ | थकबाकी नसल्याचा दाखला. (No due certificate) | ३ | ३ |
| ४ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे. (Change of Connection size) | ४ | ३ |
| ५ | मालकी हक्कात बदल करणे. (Change of ownership rights ) | ४ | ३ |
| ६ | वापरामध्ये बदल करणे (Change of usages) | ४ | ३ |
| ७ | तात्पुरते /कायम स्वरुपी नळजोडणी खंडीत करणे. (Temporary / Permanent Disconnection) | ३ | ३ |
| ८ | नळ जोडणी स्थलांतरीत करणे. (Shifting of Boring point) | ३ | २ |
| **भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय** | | | |
| ९ | विंधन विहिर /विहिर स्थळ सर्वेक्षण (Borewell survey) | २ | २ |
| १० | पाणी नमुन्यांचे रासायनिक व जैविक पृथ:करण. (Chemical and Bacterial water test) | २ | २ |
| | एकूण | ३२ | २७ |

३) कागदपत्रांची संख्या कमी करणे (Minimixing Documents) :-

| **अ. क्र.** | **सेवेचे नाव** | **सादर करावयाच्या कागदपत्रांची संख्या कमी करणे** | | **सादर करावयाची कागदपत्रे** |
|---|---|---|---|---|
| | | Before GPR | After GPR | |
| **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** | | | | |
| १ | नवीन नळ जोडणी. (New connection) | ६ | ४ | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) मालकी हक्क कागदपत्रे<br>३) थकबाकी नसल्याचा दाखला<br>४) आधार कार्ड छायांकित प्रत |
| २ | पुन:जोडणी करणे. (Reconnection) | २ | २ | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखला |
| ३ | थकबाकी नसल्याचा दाखला.( No due certificate) | ३ | २ | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) पाणीपट्टीचे शेवटचे बील भरल्याची कागदपत्रे. |
| ४ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे. (Change of Connection size) | २ | २ | ३) विहित नमुन्यातील अर्ज<br>४) थकबाकी नसल्याचा दाखला |
| ५ | मालकी हक्कात बदल करणे. (Change of ownership rights ) | ७ | ५ | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) मालकी हक्क कागदपत्रे<br>३) थकबाकी नसल्याचा दाखला<br>४) सोसायटीचे ना-हरकत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | प्रमाणपत्र<br>५) आधारकार्डची छायांकित प्रत |
| ६ | वापरामध्ये बदल करणे (Change of usages) | ३ | २ | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) वापरात बदल साठीची आवश्यक कागदपत्रे |
| ७ | तात्पुरते /कायम स्वरुपी नळजोडणी खंडीत करणे. (Temporary / Permanent Disconnection) | २ | २ | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखला |
| ८ | नळ जोडणी स्थलांतरीत करणे. (Shifting of Boring point) | २ | २ | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखला |
| भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय | | | | |
| ९ | विंधन विहिर /विहिर स्थळ सर्वेक्षण (Borewell survey) | ४ | ३ | १) नागरिकाचा अर्ज<br>२) जमीन मालकीची असल्याचा सातबारा<br>३) नागरिकाचे ओळखपत्र |
| १० | पाणी नमुन्यांचे रासायनिक व जैविक पृथ:करण. (Chemical and Bacterial water test) | १ | १ | १) नागरिकाचा अर्ज<br>२) पाण्याचा नमुना |

**४) प्रतिज्ञापत्राचे सुसूत्रीकरण करणे.(Affidavit Rationalisation) :-**

नागरिकाकडून कोणतेही प्रमाणपत्र अथवा स्वयं घोषणापत्र घेण्यात येत नाही.

**५) स्थळ पाहणी (Physical Verification) :-**

विंधन विहिरीसाठीची स्थळ निश्चिती करण्यासाठी प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्व्हे करणे आवश्यक असते. त्यानुसार अर्जदाराच्या जागेवर जाऊन स्थळ पाहणी करण्यात यावी.

**६) अंतिम प्रमाणपत्रे सुसूत्रीकरण (Output Certificate) :-**

उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगांतर्गत देण्यात येणाऱ्या १० सेवांकरिता ऑनलाईन प्रणाली विकसित केलेली असून या प्रणालीद्वारेच अंतिम प्रमाणपत्रे ऑनलाईन पध्दतीनेच निर्गमित करण्यात यावी.

**७) क्षेत्रीय कार्यालयांनी करावयाची कार्यवाही :-**

i. संदर्भाधिन क्र. ७ येथील मा.मुख्यमंत्री सचिवालयाच्या अ.शा. पत्रासोबत या विभागाच्या ८ सेवांबाबत मुख्यमंत्री सचिवालयातील GPR कक्षाने केलेल्या शिफारशी पाठविण्यात आल्या असून सदर शिफारशींचे अवलोकन करुन त्यानुसार महा आयटीकडे प्रणाली विकसित करण्याचा प्रस्ताव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा

संचालनालय यांनी, तात्काळ पाठवावा व त्याची प्रत या विभागास तसेच मुख्यमंत्री सचिवालयास सादर करावी.

ii. संदर्भाधिन क्र. ८ येथील मा.मुख्यमंत्री सचिवालयाच्या अ.शा. पत्रासोबत विविध विभागांच्या सेवांसाठीचे अर्ज, मंजूरीच्या कार्यपध्दती व नागरिकांना दिले जाणारे प्रमाणपत्र यामध्ये राज्यस्तरावर समानता आणण्यासाठी परिशिष्ट १ ते ९ नुसार शिफारशी जोडल्या आहेत. तरी सदर परिशिष्ट १ ते ९ मधील शिफारशींचे अवलोकन करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय यांनी त्यांच्या मार्फत देण्यात येणाऱ्या सेवांच्या GPR अहवालात त्यांचा योग्य समावेश करुन त्यानुसार आपले सरकार २.०, मैत्री २.० आणि महाडीबीटी २.० या प्रणालींवर सदर सेवांची सुधारित कार्यप्रणाली विकसित करण्याकरिता अहवाल महाआयटीकडे सादर करावा. व त्याची प्रत या विभागास सादर करावी.

iii. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी त्यांच्या कार्यालयाच्या १६ सेवांपैकी ८ सेवा वगळण्याचे GPR अंतर्गत निश्चित करण्यात आले आहे. तरी सदर ८ सेवा त्यांच्या संदर्भाधिन क्र. २ येथील अधिसूचनेतून वगळण्यात येत असल्याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.

iv. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय यांनी त्यांच्या मार्फत देण्यात येणाऱ्या २ सेवा या केवळ आपले सरकार पोर्टलद्वारे देण्यात येत असून त्या मैत्री २.० व महाडीबीडी २.० या पोर्टलद्वारे देण्यासाठीची कार्यवाही करावी.

v. सर्व सेवा ऑनलाईन पध्दतीनेच देण्याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१२१२५२२०९२२८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by GEETA RAHUL KULKARNI
Date: 2026.08.12 13:07:42 +05'30'

( गीता रा. कुलकर्णी )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
४. आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालय, पुणे.
५. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. निवड नस्ती.